—: नि.दि.मु.नं. १०७/२०११ मधील निशाणी ५ वरील आदेश :—
( घोषित दिनांक १४/०३/२०१२)

प्रस्तुतचा अर्ज तुर्तातुर्त ताकीद मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. संक्षिप्तमध्ये अर्ज असा की, मौजे आनंदव्हाळ, ता. मालवण येथील सर्व्हे नं. ३(३९२) हिस्सा नं. १२, क्षेत्र २.११.०, खराबा ०.६५.०, आकार रु.०.७५ पैसे, सदर मिळकतीचे स्थानिक नांव 'नमस' असे असून येणेप्रमाणे मिळकतीस ''दावा मिळकत'' असे संबोधिले आहे. सदरची दावा मिळकत ही वादीची वडिलोपार्जित संरक्षित कूळहक्काची मिळकत असून सदर मिळकत वादीचे नांवे एकत्र कुटुंब प्रमुख म्हणून हक्कपत्रकी नोंद आहे. दावा मिळकतीमध्ये वादीची हापूस आंब्याची धरती कलमे आहेत. दावा मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईट सदरी सुकांती कमलाकांत सामंत वगैरे यांची नांवे दाखल असून त्यांचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नाही. सदर सुकांती सामंत व दिवाकर सामंत हे वादीच्या दावा मिळकतीतील कब्जेवहिवाटीस हरकत करतात म्हणून वादीने त्यांचे विरुध्द नि.दि.मु.नं. ८०/१९९५ हा दावा दाखल केला होता, तो मंजूर होऊन सदर सुकांती सामंत व दिवाकर सामंत यांना दावा मिळकतीतील वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत करु नये अशी निरंतरची ताकीद देणेत आली असून नि.दि.मु.नं. ८०/१९९५ मधील निर्णया विरुध्द सुकांती कमलाकांत सामंत यांनी जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस येथे केलेले अपिल फेटाळणेत आले आहे. अशा स्थितीत सुकांती कमलाकांत सामंत व दिवाकर कमलाकांत सामंत व प्रतिवादी आणि बी. व्ही. पिंगळे हे दावा मिळकतीतील वादीच्या वहिवाटीस हरकत करुन नि.दि.मु.नं. ८०/१९९५ च्या हुकुमनाम्याचा अवमान करतात, म्हणून वादीने रेग्युलर दरखास्त नं. २/२०१० दाखल केलेली आहे.

३. अर्जात पुढे असे कथन केले आहे की, उपरोक्त परिस्थितीत प्रतिवादी हा दावा मिळकतीत दि. ०७/०८/२०११ रोजी मजूरांना घेऊन घुसला व त्याने दावा मिळकतीत २५ फूट x २० फूट लांबी रुंदीच्या चरी खोदण्यास सुरुवात केली, त्यास वादीने हरकत घेतल्यानंतर प्रतिवादीने त्या जागेत घर बांधणार असल्याचे सांगितले. प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये चिरे आणले व चौथऱ्याचे बांधकाम सुरु केले आहे. प्रतिवादी बांधकाम करीत असलेली जागा दाव्यासोबत जोडलेल्या नकाशामध्ये तांबडया रंगाने दाखविली आहे. त्यामुळे वादीने सदरचा अर्ज हा प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये दाव्यासोबतच्या नकाशात तांबडया रंगाने दाखविलेल्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये आणि वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

४. सदर अर्जास प्रतिवादीने निशाणी १९ वर म्हणणे वजा कैफियत दाखल

...२/—

केलेली आहे. म्हणण्यामध्ये वादीची दावा मिळकतीतील वहिवाट प्रतिवादीने नाकारली आहे. म्हणण्यात असे कथन केले आहे की, वादीने दाव्यासोबत जोडलेल्या नकाशात लाल रंगाने दर्शविलेल्या कथित ठिकाणी प्रत्यक्षात कोणतेही बांधकाम दावा मिळकतीत अस्तित्वात नाही. दावा मिळकत ही वादीच्या एकटयाच्या कब्जेवहिवाटीत नाही. वादीने दाव्यामध्ये दावा मिळकती संदर्भात स्वत:च्या हक्काबाबत परस्पर विरोधी विधाने केलेली आहेत. त्यामुळे सदरचा निरंतर ताकीदीचा दावा हा मालकी हक्कावरुन चालणारा नाही. वादी हा सामंत कुटुंबिय आणि महाराष्ट्र शासन यांचा जोपर्यंत कूळ आहे असे घोषित होत नाही, तोपर्यंत टायटल वरुन निरंतर ताकीदीचा दावा वादीस दाखल करता येणार नाही. प्रतिवादी हा नि.दि. मु.नं. ८०/१९९५ कामी पक्षकार नव्हता. वादीकडे दावा मिळकतीचा खरोखरी कायदेशीर कब्जा रेग्युलर दरखास्त नं. २/२०१० चे कारण घडले त्यावेळी होता किंवा कसे हा मुद्दा निर्णित झालेला नाही. अशा स्थितीत पुन्हा वादीच्या कायदेशीर कब्जेवहिवाटीत दावा मिळकत आहे की कसे हे ठरविण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १० ची बाधा येते.

५. म्हणण्यात पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादीने दावा मिळकतीत अतिक्रमण केले असे वादीचे दाव्यात कोठेही कथन नाही. दाव्यासोबत जोडलेल्या नकाशामध्ये प्रतिवादी करीत असलेले बांधकाम हे दावा मिळकतीच्या मध्यभागी आहे. तसेच प्रतिवादीने दावा मिळकतीत चर खोदून चिरे आणून ठेवलेले आहेत आणि घराच्या चौथऱ्याचे बांधकाम सुरु केलेले आहे असे वादकथन वादीने केले आहे. सदरचे वादकथन पहाता, संपूर्ण दावा मिळकतीचा कब्जा हा प्रतिवादीकडे आहे. प्रतिवादीने दावा मिळकतीत चिरे उतरविले आहेत व त्याचे मजूर दावा मिळकतीमध्ये वावरत आहेत, अशा परिस्थितीत दावा मिळकतीमध्ये वादीचा कब्जा राहिलेला नाही असेच दाव्यातील वादकथनावरुन सिध्द होते. अशा स्थितीत वादीचा घराच्या चौथऱ्याचे बांधकाम काढून टाकण्याच्या आज्ञापक ताकीदीचा व जागेचा कब्जा देण्याबाबत विनंतीचा दावा चालणारा नाही.

६. म्हणण्यात पुढे असे कथन केले आहे की, दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ ची बाधा येते. वादी व दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर दर्शविलेल्या व्यक्ति या दावा मिळकतीच्या कूळ नाहीत, तसेच ते दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीत नाहीत. वादीने सदरचा दावा हा इतर कूळांकरीता देखील दाखल केला आहे असे दाव्यात कथन नाही. वादीने कब्जाची दाद केवळ स्वत:पुरती मागितलेली आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम ८ मधील तरतूदींची वादीने पूर्तता केलेली नाही. अर्जामध्ये निश्चित दावा मिळकतीपैकी कोणत्या क्षेत्रातील वादी कूळ आहे ते नमूद केलेले नाही. दावा मिळकतीच्या

८ आणे क्षेत्रास महाराष्ट्र शासनाचे नांव दाखल असून उर्वरीत ८ आणे क्षेत्र सामंत कुटुंबिय यांचे मालकीचे असून त्यांच्यामध्ये आपापसात वाटपे झालेली नाहीत. वादी हा महाराष्ट्र शासनाचा कूळ आहे असे कोणत्याही सक्षम न्यायालयाने घोषित केलेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा असे कथन केले आहे.

७. म्हणण्यात पुढे असे कथन केले आहे की, वादीच्या दाव्यातील कथनावरुन दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीचा कब्जा आहे हे वादीने कबुल केले आहे. दावा मिळकत ही मालवण ते कसाल जाणाऱ्या राज्य महामार्गापासून १८० ते २०० फूट अंतरावर आहे असे वादीने दाव्यासोबत जोडलेल्या नकाशावरुन दिसून येते. वादीने दावा मिळकतीच्या चतु:सीमा किंवा दावा मिळकतीमध्ये प्रवेश करण्याकरीता असलेले रस्ते दाव्यात नमूद केलेले नाहीत. मिळकतीकडे कसाल राज्य महामार्गावरुन दावा मिळकतीत प्रवेश करणेस वाट आहे. दावा मिळकतीचा संपूर्ण कब्जा मागण्याची वादीस संधी असताना वादीने हेतूपुरस्सर मर्यादित क्षेत्राचा कब्जा प्रतिवादीकडे मागितला आहे. त्यामुळे वरील कारणांवरुन अर्ज नामंजूर करणेत यावा असे म्हणणे दाखल केलेले आहे.

८. अर्ज व म्हणण्यावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदविले आहेत, ते खालीलप्रमाणे.

| —: मुद्दा :— | | —: निष्कर्ष :— |
|---|---|---|
| १. वादीस सकृतदर्शनी केस आहे असे वादी सिध्द करतो का ? | .... | होकारार्थी. |
| २. वादीच्या बाजूने न्यायाच्या समतोलाचा तराजू आहे असे वादी सिध्द करतो का ? | .... | होकारार्थी. |
| ३. मनाई न दिल्यास वादीचे अपरिमित नूकसान होणारे आहे असे वादी सिध्द करतो का ? | .... | होकारार्थी. |
| ४. आदेश काय ? | .... | अर्ज मंजूर करणेत येतो. |

—: का र ण मि मां सा :—

९. अर्जाच्या पृष्टयर्थ वादी याने निशाणी ६ वर दावा मिळकतीचा ७/१२ उतारा, निशाणी ७ वर सर्व्हे नं. ३९२ हिस्सा नं. १२ व १३ चा नकाशा, निशाणी ८ वर नि.दि.मु.नं. ८०/१९९५ मधील हुकुमनाम्याची प्रमाणित प्रत, निशाणी ९ वर नि.दि.मु.नं. ८०/१९९५ मधील न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत, निशाणी ३२ वर रेग्युलर दरखास्त नं. २/२०१० कामी त्यातील सामनेवाला नं. १ ते ३ यांनी दिलेल्या म्हणण्याची प्रमाणित प्रत, निशाणी ३९

वर सर्व्हे नं. ३(३९२) हिस्सा नं. १२ चा सन १९९४—९५ सालचा ७/१२ उतारा, निशाणी ४० वर फेरफार नं. ५७२० ची प्रमाणित प्रत, निशाणी ४१ वर सर्व्हे नं. ३९२ हिस्सा नं. १२ ची सन १९५७—५८ पासून सन १९६४—६५ पर्यंतची परिस्थिती दर्शविणारा ७/१२ उतारा, निशाणी ४२ वर वादीने दावा मिळकतीचा कर भरल्याबद्दलच्या पावत्या, निशाणी ४३ वर कूळवहिवाट अपिल नं. ४५/२००० मधील आदेशाची प्रमाणित प्रत, निशाणी ४४ वर टेनन्सी केस नं. १०१/१९९७ कामी सुकांती कमलाकांत सामंत हिने दिलेल्या जबाबाची प्रमाणित प्रत, निशाणी ४५ वर टीएनसी/रिव्ही. नं. १३७/बी/२००५ कामी दिलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत, निशाणी ५२ वर फेरफार नं. ८९४६ ची प्रमाणित प्रत, निशाणी ४ सोबत अ.नं. ५ व ६ वर दावा मिळकतीचे फोटो दाखल केलेले आहेत.

याउलट, प्रतिवादीने अर्जाकामी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

—: मुद्दा नं. १ ते ३ बाबत :—

१०. वादीने अर्जामध्ये असे कथन केले आहे की, दावा मिळकतीमध्ये त्याची संरक्षित कूळ म्हणून कब्जेवहिवाट असून ७/१२ सदरी एकत्र कुटुंब प्रमुख म्हणून त्याच्या नांवाची नोंद आहे. दावा मिळकतीमध्ये वादीची हापूस आंब्याची धरती कलमे असून त्याचे उत्पन्न वादीचे कुटुंबियच घेतात. दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी सुकांती कमलाकांत सामंत व दिवाकर कमलाकांत सामंत यांची नांवे दाखल असून ते दावा मिळकतीतील वादीच्या वहिवाटीस हरकत करतात म्हणून वादीने नि.दि.मु.नं. ८०/१९९५ हा दावा दाखल केला होता व त्याकामी सदर सुकांती सामंत व दिवाकर सामंत यांना वादीच्या दावा मिळकतीतील कब्जेवहिवाटीस हरकत करु नये अशी निरंतरची ताकीद देणेत आलेली आहे. अशा स्थितीत सदर नि.दि.मु.नं. ८०/१९९५ मधील न्यायनिर्णया विरुध्द सदर सामंत यांनी दाखल केलेले अपिल फेटाळणेत आले. सदर सुकांती सामंत आणि दिवाकर सामंत व प्रतिवादी तसेच इतर हे वादीच्या दावा मिळकतीतील वहिवाटीस हरकत, अडथळा करुन नि.दि.मु.नं. ८०/१९९५ मधील हुकुमनाम्याचा अवमान करतात म्हणून वादीने सदर इसमां विरुध्द रेग्युलर दरखास्त नं. २/२०१० दाखल केलेली आहे.

११. प्रतिवादी हा दि. ०७/०८/२०११ रोजी काही मजूरांना घेऊन दावा मिळकतीत आला व त्याने २५ फूट x २० फूट एवढया लांबी रुंदीची चर खोदण्यास सुरुवात केली. त्याबाबत वादीने दाव्यासोबत नकाशा देऊन त्यामध्ये लाल रंगाने चर खोदलेली जागा दाखविलेली आहे. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकीद मिळण्याकरीता आणि प्रतिवादीने दावा मिळकतीत दाव्यासोबत जोडलेल्या नकाशात लाल रंगाने दाखविलेल्या

ठिकाणी बांधलेल्या घराचे चौथऱ्याचे बांधकाम काढून त्याठिकाणचा कब्जा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादीने अर्जास दिलेल्या म्हणण्यामध्ये वादीने दाव्यामध्ये प्रतिवादीने दावा मिळकतीत घराच्या चौथऱ्याचे बांधकाम केले असून त्याखालील जागेचा कब्जा मागितलेला आहे, यावरुन दावा मिळकत ही प्रतिवादीच्या कब्जात आहे असे दिसून येते, त्यामुळे वादीच्या दावा मिळकतीतील कथनावरुन दावा मिळकत ही प्रतिवादीच्या कब्जेवहिवाटीत आहे असे दिसून येते असे कथन केलेले आहे.

१२. वादीने अर्जाकामी निशाणी ६ वर दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला असून त्यामध्ये वादीच्या नांवाची नोंद कूळ म्हणून असल्याचे दिसून येते. नि.दि.मु.नं. ८०/१९९५ मधील न्यायनिर्णयाची प्रत निशाणी ९ वर दाखल केली असून नि.दि.मु.नं. ८०/१९९५ हा दावा सुकांती सामंत आणि दिवाकर सामंत यांचे विरुध्द निरंतर ताकीद मिळण्याकरीता दाखल केलेला होता. सदर नि.दि.मु.नं. ८०/१९९५ कामी दावा मिळकतीत वादी हा संरक्षित कूळ असून त्याची दावा मिळकतीत कब्जेवहिवाट आहे असे कथन होते. सदरचा दावा हा गुणावगुणावर निर्णित झाला असून दावा मिळकतीत वादीची कब्जेवहिवाट आहे असे सिध्द झालेले आहे. सुकांती सामंत यांनी वादी हा दावा मिळकतीत कूळ नाही असे ठरवून मिळण्याकरीता टेनन्सी केस नं. १०१/१९९७ दाखल केली होती, सदर टेनन्सी केसकामी वादी हा दावा मिळकतीचा कूळ नाही असे ठरले, परंतु त्याविरुध्द उप विभागीय अधिकारी, कणकवली यांचेकडे वादीने अपिल नं. ४५/२००० दाखल केले होते, सदरचे अपिल मंजूर झालेले आहे. सदर निर्णयावरुन दावा मिळकतीत वादी हा संरक्षित कूळ असल्याचे दिसून येते. वादीने निशाणी ४४ वर टेनन्सी केस नं. १०१/१९९७ मधील सुकांती सामंत हिच्या जबाबाची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. सुकांती सामंत हिने तिच्या जबाबात दावा मिळकतीस सन १९४८ साली कृष्णा गोपाळ शिंदे याचे नांव दाखल झाले, सदरची नोंद फेरफार नं. ५७२० ने दाखल झाली, सदर फेरफारा विरुध्द तिने अपिल केलेले नाही, कृष्णा गोपाळ शिंदे याचे पश्चात साबा कृष्णा शिंदे याचे नांव दाखल झाले होते, तसेच कृष्णा गोपाळ शिंदे हे दावा मिळकतीचे संरक्षित कूळ होते ही बाब मान्य केलेली आहे. फेरफार नं. ५७२० हा निशाणी ४० वर दाखल केला असून त्यामध्ये कृष्णा गोपाळ शिंदे यास संरक्षित कूळपणाचा हक्क सन १९४८ साली प्राप्त झाल्याबाबतचा उल्लेख केलेला आहे. तसेच निशाणी ४१ वरील ७/१२ उतारा पहाता सन १९५७—५८ पासून सन १९६४—६५ पर्यंतच्या कालावधीत कृष्णा गोपाळ शिंदे यांच्या नांवाची नोंद कूळ म्हणून ७/१२ सदरी असल्याचे दिसून येते. कृष्णा गोपाळ शिंदे याचे पश्चात साबा कृष्णा शिंदे याच्या नांवाची

नोंद संरक्षित कूळ म्हणून झाल्याचे दिसून येते.

१३. प्रतिवादी तर्फे असा युक्तिवाद करणेत आला की, निशाणी ६ वरील दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पहाता, त्यामध्ये महाराष्ट्र शासन यांचा ८ आणे हिस्सा दर्शविला आहे. अशा स्थितीत वादी हा महाराष्ट्र शासनाचा संरक्षित कूळ कसा होऊ शकतो ? तसेच सामंत कुटुंबियांचा दावा मिळकतीमध्ये ८ आणे हिस्सा दर्शविलेला आहे. परंतु वादीने ८ आणे हिश्श्याकरीता त्याची दावा मिळकतीत कूळवहिवाट असल्यास त्या मिळकतीच्या चतु:सीमा अर्जाकामी दिलेल्या नाहीत. वादीने सदर युक्तिवादाचे खंडन करण्याकरीता निशाणी ५२ वर फेरफार नं. ८९४६ ची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्यामध्ये राजाराम विनायक कुळकर्णी यांचेकडून इनकम टॅक्स बाकी होती, त्यापोटी सदर दावा मिळकतीसह त्यांच्या अन्य मिळकतींचा लिलाव झाला, त्यामध्ये इनकम टॅक्स खात्यातर्फे सदरची दावा मिळकत लिलावात घेणेत आली व सदरचा व्यवहार हा सन १९५७ साली झाला असे दिसून येते. परंतु दावा मिळकतीमध्ये कृष्णा गोपाळ शिंदे याची कूळवहिवाट सन १९४८ सालापासून असल्याबाबत फेरफार नं. ५७२० वरुन दिसून येते. त्यामुळे संपूर्ण दावा मिळकतीमध्ये वादीचीच कब्जेवहिवाट असल्याचे सदर कागदपत्रांवरुन सिध्द होते. सबब, प्रतिवादीतर्फे उपरोक्त करणेत आलेल्या युक्तिवादामध्ये तथ्य दिसून येत नाही.

१४. नि.दि.मु.नं. ८०/१९९५ मध्ये फेरफार नं. ४४ नुसार वादीचे वडिल साबा कृष्णा शिंदे हे मयत झाल्यानंतर वादीच्या नांवाची नोंद दावा मिळकतीस एकत्र कुटुंब प्रमुख म्हणून झाली असे निष्कर्षामध्ये नमूद केलेले आहे. तसेच वादीने दाव्याकामी दावा मिळकतीचा कर भरल्याबाबतच्या पावत्या निशाणी ४२ वर दाखल केलेल्या आहेत. तसेच दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यामध्ये वादीच्याच नांवाची नोंद वहिवाट सदरी दिसून येते. त्यामुळे दावा मिळकतीत प्रथमदर्शनी वादीचीच कब्जेवहिवाट असल्याचे दिसून येते.

१५. प्रतिवादीने त्याच्या म्हणण्यात असे कथन केले आहे की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीने चर खणले आणि घराचे चौथऱ्यापर्यंतचे बांधकाम केलेले आहे असे वादीचे दाव्यातील वादकथन आहे, यावरुन वादी दावा मिळकतीतील प्रतिवादीची कब्जेवहिवाट मान्य करतो. परंतु वादीने दिलेला पुरावा पहाता, दावा मिळकतीमध्ये वादीचीच कब्जेवहिवाट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादीने त्याच्या अर्जाकामी प्रतिवादी हा दि. ०७/०८/२०११ रोजी काही मजूरांना घेऊन दावा मिळकतीत घुसला व त्याने २५ फूट x २० फूट लांबी रुंदीची चर खोदण्यास सुरुवात केली, त्यास वादीने हरकत केली असता प्रतिवादीने वादीस धमकी दिली व दि. २३/०८/२०११ रोजी दावा मिळकतीत प्रतिवादीने

चिरे आणले व वादीच्या हरकतीस न जुमानता मजूरांकरवी सदर घराच्या चौथऱ्याचे बांधकाम सुरु केले असे कथन केले आहे. सदर कथनावरुन प्रतिवादीने संपूर्ण दावा मिळकतीचा कब्जा घेतला असे वादीचे म्हणणे असल्याचे दिसून येत नाही. वादीने सदरचा दावा हा दि. ३०/०८/२०११ रोजी तातडीने दाखल केल्याचे दिसून येते. प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये त्याची कब्जेवहिवाट असल्याबाबत कोणताही पुरावा दाव्याकामी दाखल केलेला नाही. वादीचे प्रतिवादी दांडगाईने दावा मिळकतीत बांधकाम करीत असल्याचे कथन आहे. प्रतिवादीने दांडगाईने केलेले चौथऱ्यापर्यंतचे बांधकाम काढून मिळून त्या बांधकामाच्या क्षेत्राखालील कब्जा मिळण्याबाबतचा वादीचा दावा आहे. प्रतिवादीने दावा मिळकतीशी तो कसा संबंधीत आहे व त्याची दावा मिळकतीमध्ये कब्ज्वेहिवाट कशी आहे याबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. तसेच प्रतिवादीने दावा मिळकतीत त्याचा दिर्घकालीन कब्जा असल्याबाबतचा देखील कोणताही पुरावा अर्जाकामी दिलेला नाही. अशा स्थितीत वादीने त्याच्या कब्जेवहिवाटीबाबत प्रथमदर्शनी दिलेला पुरावा पहाता वादीची दावा मिळकतीमध्ये त्याच्या पूर्वाधिकाऱ्यांपासून कब्जेवहिवाट असल्याचे दिसून येते. अशा स्थितीत दांडगाईने प्रतिवादी दावा मिळकतीत बांधकाम करीत असल्याचे वादीने दाखल केलेल्या निशाणी ४ सोबत अ.नं. ५ व ६ वरील छायाचित्रांवरुन दिसून येते. अशा स्थितीत वादीने केवळ त्या बांधकामाखालील क्षेत्राच्या कब्जाची मागणी दाव्यात केली म्हणून संपूर्ण दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीचा कब्जा आहे असे म्हणता येणार नाही व तो कब्जा ताकीदी सारख्या हुकुमाने संरक्षित करता येणारा नाही. याउलट, वादीने दिलेला पुरावा पहाता, दावा मिळकतीत वादीची त्याच्या पूर्वाधिकाऱ्यांपासून कब्जेवहिवाट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, वादीस प्रथमदर्शनी केस आहे, न्यायाच्या समतोलाचा तराजू वादीच्या बाजूने आहे. अशा स्थितीत प्रतिवादीने दावा मिळकतीत बांधकाम केल्यास वादीचे अपरिमित नूकसान होणारे आहे. सबब, मुद्दा नं. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविणेत येत आहेत व मुद्दा नं. ४ करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

<u>—: आ दे श :—</u>

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीने कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये आणि दावा मिळकतीतील वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करु नये अशी प्रतिवादीस दाव्याचा अंतिम निर्णय लागेपर्यंत तुर्तातुर्त ताकीद देणेत येत आहे.

३. अर्जाचा खर्च दाव्याचा अंतिम निर्णय ज्याच्या पक्षात होईल त्याच्या पक्षात जाईल.

मालवण,
दिनांक : १४/०३/२०१२.

( आर. जे. पाटील )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मालवण.